CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X , Vol. VI , April. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# तौलनिक साहित्य संशोधन

**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे**
रयत शिक्षण संस्थेचे, शरदचंद्र पवार महाविदयालय, लोणंद जि. सातारा

-------- (12) --------------------------------------------------------------------

तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना पाश्चात्य देशात विकसित झालेली समीक्षेची, संशोधनाची व साहित्याभ्यासाची एक नवी पध्दत आहे. युरोपात 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात या अभ्यासाला सुरूवात झाल्याचे दिसते. मॅथ्यू आर्नोल्ड यांना तौलनिक साहित्याभ्यास संकल्पनेचे श्रेय दिले गेले. जर्मनांनी हे श्रेय गटे या महाकवीला दिले तर फ्रेंचमध्ये हे श्रेय मादाम स्टेल यांना दिले गेले. जर्मनी या देशाने तुलनात्मक साहित्याभ्यासाला खूप मोठे महत्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. भारतामध्ये 20 व्या शतकात 'शकुंतला, मिरांडा आणि डेस्डिमोना' हा लेख लिहून बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी तैलनिक साहित्याभ्यासाला सुरूवात केल्याचे मानले जाते.

मराठीतील एक महत्वाचे कवी आणि गुरूदेव रवींद्रनाथ टागोर तौलनिक साहित्याभ्यास अध्ययन , मुंबई येथील माजी प्रमुख प्रा. वसंत बापट यांनी लिहिलेला 'तौलनिक साहित्याभ्यास (1981), तौलनिक साहित्याभ्यास तत्वे आणि दिशा (1992) हा डॉ. चंद्रशेखर जहागिरदार यांनी संपादित केलेला ग्रंथ, डॉ. आनंद पाटील यांचा 'तौलनिक साहित्यःनवे सिद्धांत आणि उपयोजन' हा तपशील देणारा ग्रंथ,' तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाड्.मय' (2003) हा एक डॉ. र.बा.मंचरकर लिखित ग्रंथ, डॉ. अनंत राऊत यांचा 'तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण' (2011) हा ग्रंथ 'तौलनिक साहित्यभ्यास संकल्पना व स्वरूप (2012) हा डॉ. निशिगंधा व्यवहारे यांचा ग्रंथ, व अलिकडे प्रकाशित झालेला डॉ. निशिकांत मिरजकर यांचा तौलनिक साहित्य (2016) आदि ग्रंथ तौलनिक साहित्याभ्यासा संबंधी लिहलेला आहेत.

तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना पाश्चिमात्य अभ्यासकांकडून आपल्याकडे आलेली आहे. ऑस्कर जे कॅम्पबेल, वेर्नर फ्रेडरिच, आर.जी.माऊलटन, रेने वेलेक, ए.आल्ड्रिज आवन, एस.एस.प्रावर, हेन्री एच.एच.रेमाक आदि पाश्चिमात्य अभ्सासकांनी तौलनिक साहित्य संकल्पने संदर्भात आपले विचार स्पष्ट केले आहेत.

**1) पॉल वॅन टिघेम :–**

तौलनिक साहित्याचा अत्यावश्यक हेतू म्हणजे निरनिराळया साहित्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास होय.

**2) हेन्री एच. एच. रेमाकः–**

तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशांच्या बंदिस्त सीमेपलीकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्पर संबंधाचा तर दुस–या बाजुला कला, तत्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्रे, विज्ञान, धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रध्दा क्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात ही एका साहित्याची दुस–या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाड्.मयाची इतर मानवी अविष्कार क्षेत्रांशी केलेली तुलना असते.



CamScanner

**3) एस.एस.प्रावर :–**

एकापेक्षा अधिक साहित्यकृतींची परस्पर भेद, साधर्म्य, स्थूल मूलाधार किंवा प्रभाव यांच्या शोधाद्वारे केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्य होय.

**4) वसंत बापट :–**

साधर्म्य आणि वैधर्म्य, उदगम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला तुलनात्मक शोध म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय.

**5) डॉ. आनंद पाटील :–**

तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतिसापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून सांस्कृतिक, राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी वाड्.मय आणि इतर कला साहित्य आणि नवी जुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पध्दतींच्या परस्पर व्यामिश्र संबंधाची अनेक विद्याशाखीय दृष्टीकोन वापरून विविध पातळयांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा होय.

**6) डॉ. अनंत राऊत :–**

दोन किंवा अधिक मग त्या एका भाषेतील असतील किंवा वेगवेगळया भाषा, प्रांत वा देशातील असतील अशा साहित्यकृती, साहित्यिक किंवा साहित्य प्रवाहांचा तुलनेला प्राणभूत तत्व मानून परस्परांमधील साम्य भेदांची व सामर्थ्य मर्यादांची नोंद घेत केलेला अभ्यास, ज्यात अशा साहित्यातील अनेकविध प्रकारच्या परस्पर संबंधांचा, एकमेकांवरील प्रभावांचा आदान प्रदानाचा व त्यावर झालेल्या भौगोलिक, धार्मिक, तत्वज्ञानिक, राजकीय, सामाजिक घटकांच्या प्रभावांचा, त्यातील परस्पर संबंधाच्या एका वैश्विक अशा मानवतावादी भूमिकेतून केल्या जाणा–या साहित्याभ्यासास तौलनिक साहित्य असे म्हणावे.

साहित्य संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. त्यापैकी तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्य अभ्यासाची, समीक्षेची व संशोधनाची ही एक पध्दती आहे. आजच्या काळात तुलनात्मक संशोधनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. साहित्य, कला, विज्ञान, उद्योग अशा विविध क्षेत्रात तुलनात्मक संशोधनाला व मूल्यांकनाला महत्व प्राप्त झाले आहे. तुलनात्मक वृत्ती ही माणसाची जन्मजात प्रवृत्ती आहे. तुलनेतून विकास करता येतो. त्यामुळे तुलनात्मक वृती मानवी जीवनात महत्वाचे कार्य करते. साहित्याच्या क्षेत्रातही तुलनात्मक अभ्यासाला महत्व आहे. साहित्य परंपरेच्या विकासात तुलना महत्वाचे कार्य करते. एका भाषेतील साहित्यकृतीची दुस–या भिन्न भाषेतील साहित्यकृतीशी तुलना करणे ही तुलनात्मक साहित्य संशोधनात अपेक्षित असते.या संशोधन पध्दतीचा अवलंब मराठी भाषेत अलीकडील काही वर्षात अधिक प्रमाणात होत आहे. भारताच्या मराठी हिंदी, गुजराती, कन्नड, तेलगू, तमिळ, मल्याळम, उर्दू, पंजाबी, सिंधी, काश्मिरी, बंगाली, उडिया, आसामी आदि भारताच्या प्रमुख भाषा आहेत. दोन भिन्न भाषेच्या संस्कृतीतील साहित्याला महत्व असते. भारतामधील बहुविविधता वौशिष्टपूर्ण आहे. यातूनच निर्माण झालेल्या साहित्याचे वेगळेपण तौलनिक साहित्याभ्याद्वारे अभ्यासले जाते.

तौलनिक साहित्याभ्यास या संज्ञेमध्ये तुलना, साहित्य व अभ्यास या शब्दांना खूप महत्व आहे. 'तुलना' हाच तौलनिक साहित्याभ्यासाचा प्राणभूत घटक आहे. 'दोन साहित्यकृतींची तुलना तौलनिक साहित्याभ्यास' अशी संकल्पना मांडली जात असली तरी ती पुरेशी नाही. तौलनिक साहित्याभ्यासात

दोन साहित्यकृतींच्या अभ्यासाबरोबरच इतर विद्याशाखांचे त्या साहित्यकृतींना लाभलेले संदर्भही लक्षात घ्यावे लागतात. भाषा, प्रदेश, देश, संस्कृती यांच्या सीमा ओलांडून हा साहित्याभ्यास केला जातो. वेगवेगळया भाषेतील साहित्यपरंपरा, प्रवृत्ती, संस्कृती व मानवी जीवनाचा वेध घेणारा हा अभ्यास असतो. वेगवेगळया भाषेतील साधर्म्य वैधर्म्याचा शोध घेतला जातो.

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये दोन भिन्न भाषेतील साहित्यकृती अथवा साहित्यप्रवाहांची तुलना केली जाते. या तुलनेत कधीही कोण श्रेष्ठ कोण उच्च दर्जाचे हे ठरवले जात नाही तर ही तुलना वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते. दोन भिन्न भाषेतील साहित्यकृतींची अथवा साहित्यकारांची तुलना करताना साहित्याभ्यासकाला दोन्ही भाषांमधील वाड्.मयीन परंपरांचे भान असणे गरजेचे असते. डॉ.निशिकांत मिरजकर यांच्या मते, दोन साहित्यिकांची अथवा साहित्यकृतींची तुलना करावयाची असेल तर कोणता तरी एक संबंध असावा लागतो. त्यामध्ये प्रभाव, समान प्रेरणास्थळ, समान तत्वप्रणाली, वाड्.मयीन सृजनाला कारणीभूत होणारी समान परिस्थिती, समान आधारसामग्री, समान वाड्.मयप्रकार व समान आशयसुत्रे ही आधारतळे असावयास हवी.

ज्ञानक्षेत्रातील कोणत्याही विद्याशाखेत विज्ञान, मानव, सामाजिक शास्त्र, कला, संशोधनास तुलनात्मक पध्दतीचा अपरिहार्यपणे प्रयोग करावाच लागतों. तुलनात्मक पध्दतीचा वापर संशोधनात फार प्राचीन काळापासून केला जात असे. सर विल्यम जोन्सने भारतीय भाषाविषयक विद्याशाखा स्थापन करून भारतीय साहित्य व युरोपीय साहित्य यांच्या तुलनात्मक अभ्यासाचा पाया घातला. तुलनात्मक संशोधनात सर विल्यम जोन्स यांचा महत्वाचा वाटा दिसतो. त्यांनी संस्कृत व युरोपीयन भाषा यात साम्य दाखवून त्यांचा वंश एकच असल्याचे सिध्द केले. तौलनिक भाषाविज्ञानाचा पाया या भाषेच्या तुलनात्मक संशोधनाने घातला गेल्याचे डॉ. सु.रा.चुनेकर यांचे मत आहे. तुलनात्मक संशोधनाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. जगातील कोणत्याही दोन भाषा, दोन कालखंड, प्रवृत्ती, साहित्यप्रवाह, भाषाशास्त्र, व्याकरण, अनुवाद इत्यादि घेऊन त्यावर तुलनात्मक संशोधन होऊ शकते.

अलिकडील काळात तौलनिक साहित्याभ्यासाला विशेष महत्व मिळते आहे. भरत हा बहुभाषिक देश असल्याने भारतात तौलनिक साहित्याभ्यासाला अधिक चालना मिळते आहे. भारतीय भाषेतील समानता, एकता यांचाही शोध या अभ्यासपध्दतीत घेतला जातो. समाजाच्या संस्कृतीचाही अभ्यास होत असल्याने असे संशोधन सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाचे असते. दोन भिन्न भाषेतील साहित्यपरंपरा, प्रवृत्ती, साधर्म्य वैधर्म्य आदि बाबी स्पष्ट होत असल्याने वाड्.मयीन जीवनमूल्ये यांची देवाणघेवाणही होते. आपल्याला आपल्या भाषेतील साहित्याच्या परंपराही जाणून घेता येतात. अन्य भाषेतील साहित्य, संस्कृती व समाजाशी जोडता येते.

तुलनात्मक संशोधन हे राष्ट्रीय संस्कृती, एकात्मता व सहकार्य यास अत्यंत पोषक आहे. विविध देश, प्रांत व अन्य प्रदेशातील साहित्य समृध्दीचे ज्ञान होऊन आपल्या स्वभाषेतील साहित्याचे परीक्षण करता येते.

तुलनात्मक साहित्याभ्यास करणा—या अभ्यासकाकडे, संशोधनाकडे कोणते गुण असावयास हवेत याविषयी डॉ. अनंत राऊत यांनी सांगितले आहे.

1) तुलनात्मक साहित्याभ्यास ही अत्यंत व्यापक अभ्यासपध्दती असल्याने अभ्यासक हा बहुश्रुत असणे अपेक्षित आहे. त्यांच्याकडे जीवनाकलनाची, साहित्याच्या आकलनाची प्रगल्भ अशी बुध्दीमत्ता असेल, मनाची संवेदनशीलता असेल तर त्याच्या हातून उत्तम असा तुलनात्मक साहित्याभ्यास होऊ शकतो.
2) तुलनात्मक साहित्याभ्यासकाकडे साहित्याचा आस्वाद घेण्याची व चिकित्सक वृत्ती असावयास हवी.
3) साहित्यसमीक्षेच्या निकषांची उत्तम जाण असली पाहिजे.
4) तुलनात्मक साहित्याभ्यासकाला किमान दोन अथवा अधिक भाषा चांगल्या प्रकारे अवगत असल्या पाहिजे. अभ्यासक बहुभाषिक असेल तर आधिक चांगले.
5) तुलनात्मक साहित्याभ्यासकाकडे एक व्यापक जीवनदृष्टी असावयास हवी. स्वतःच्या भाषेतील व देशातील साहित्य संस्कृतीबद्दल जशी आस्था असते तशी वैश्विक साहित्य संस्कृती बद्दलदेखील चांगली आस्था असावयास हवी.
6) सर्वच क्षेत्रातील साहित्यसंस्कृतीकडे पाहण्याचा अभ्यासकाकडे एक पूर्वग्रहरहित दृष्टिकोन असावा. मानवी जीवनातील व्यापक अशा शाश्वत मूल्यांवर त्याची श्रध्दा असावयास हवी.
7) निरनिराळया साहित्यकृतीमंधील तत्थ्यांचा चोखंदळपणे सूक्ष्म असा शोध घेण्याची वृत्ती त्याच्यामध्ये असावयास हवी.
8) ज्या साहित्यकृतींची त्याला तुलना करावयाची आहे त्या साहित्यकृतीमंधील जीवनविषयक दृष्टिकोन त्यातील जीवनानुभवाची व्यापकता व सखोलता याची त्याला जाणीव असावी.

तुलनात्मक साहित्याचा अभ्यासक हा एक सर्वसामान्य वाचक म्हणून चालत नाही तर त्याच्याकडे वर उल्लेख केलेली कमाल नसली तरी किमान गुणवत्ता असलीच पाहिजे. भिन्न भाषेतील साहित्याच्या अनुवादावर आपले संशोधन अवलंबून न ठेवता ती भाषा चांगल्या त–हेने आत्मसात करून संशोधन विषयाच्या मूळ साहित्याचा अभ्यास करावयास हवा. भिन्न भाषेतील ज्ञानाबरोबरच संशोधकाला साहित्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र या विद्याशाखांचे ज्ञान असणे गरजेचे आहे.

तुलनात्मक साहित्य संशोधनात तुलनात्मक संशोधन पध्दती केंद्रस्थानी ठेवून वर्गीकरणात्मक, स्पष्टीकरणात्मक, समस्यामूलक, अन्वेषणात्मक, संश्लेषणात्मक, समीक्षात्मक, सर्वेक्षणात्मक, क्षेत्रीय व स्तरीय या संशोधन पध्दतींचा पूरक म्हणून स्वीकार व्हावा असे डॉ. निशिगंधा व्यवहारे यांना वाटते. तुलनात्मक साहित्य संशोधनात तुलना हाच प्रमुख आधार असतो. तुलनात्मक साहित्य संशोधनाचे क्षेत्र भारतासारख्या बहुभाषिक व समृध्द साहित्य परंपरा लाभलेल्या देशात अत्यंत व्यापक होत आहे.

**संदर्भ :–**

1) डॉ. मिरजकर निशिकांत, तौलनिक साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2006
2) डॉ. राऊत अनंत, तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2011



CamScanner

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X, Vol. VI, April. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

3) डॉ. व्यवहारे निशिगंधा, तौलनिक साहित्याभ्यास संकल्पना आणि स्वरूप, कीर्ती प्रकाशन, द्वितीयावृत्ती, 2005

4) डॉ. चुनेकर सु.रा. (संपा), संशोधन : स्वरूप आणि व्याप्ती, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, प्रथमावृत्ती,1983